सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव (उपचिटणीस शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड, 413501 दुरध्वनी क्र.02472-227301
Email Id- rdc1osmanabad@gmail.com

महाराष्ट्र शासन

**वाचा:-** 1) मा.पोलीस अधिक्षक धाराशिव यांचे पत्र क्रं.जिविशा/लेझर/2400/2025 दि. 02/04/2025
2) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता – 2023 चे कलम 163

जा.क्र.2025/उपचिटणीस/एमएजी-3/सिआर- दिनांक:- 08/04/2025

**<u>भारतीय नागरीक सुरक्षा संहिता – 2023 चे कलम 163 अन्वये प्लाझमा,बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापरास निर्बंध आदेश.</u>**

ज्याअर्थी, वाचा क्र. 1 अन्वये पोलीस अधिक्षक यांनी पत्र दिले आहे की, धाराशिव जिल्हयात दि.12/04/2025 रोजी हनुमान जयंती व दि.14/04/2025 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त जिल्हाभर दि.30.04.205 पावेतो विविध पक्ष / संघटना व मंडळाकडून मिरवणुक / रॅली / शोभायात्रा आयोजित करण्यात येतात.

मिरवणुक / रॅली / शोभायात्रा प्रसंगी आयोजकांकडून प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटचा मोठया प्रमाणात वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटचे प्रखर प्रकाशामुळे मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले व मिरवणुक पाहण्यास आलेले लहानमुले, वयोवृध्द, जेष्ठ नागरीक,सामान्य नागरीक यांचे डोळयास इजा होवून त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. सदर प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटच्या प्रखर प्रकाशामुळे रस्त्यावरुन जाणारे वाहन चालकांचे वाहनांवरील नियंत्रण सुटून अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी दि.12/04/2025 ते दि.30/04/2025 या कालावधीत साजरे होणारे जयंती उत्सव अनुषंगाने प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर करु नये म्हणून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम 163 प्रमाणे बंदी आदेश संपूर्ण धाराशिव जिल्हयात जारी करण्याची विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता – 2023 कलम 163 (1) या कलमांखाली जेथे कोणत्याही कारणांने नागरीकांच्या जिवीतास अथवा आरोग्यास धोका निर्माण होईल असे पुरेसे कारण असेल तेंव्हा तात्काळ प्रतिबंध करण्याची तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, धाराशिव जिल्हयामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुका / रॅली / शोभायात्रा शांततेच्या वातावरणांत पार पाडला जावा आणि कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये मिरवणुका / रॅली / शोभायात्रा मध्ये नागरीकांच्या डोळयांच्या सुरक्षेसाठी प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर कटाक्षाने टाळणे आवश्यक असल्याची बाब माझे निदर्शनास आणलेली आहे.

त्याअर्थी मी, शोभा जाधव,अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव भारतीय नागरीक सुरक्षा संहिता – 2023 चे कलम 163 अन्वये धाराशिव जिल्हयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुका / रॅली / शोभायात्रा शांततेत पार पाडाव्यात आणि कायदा व सुव्यवस्थेच्या व नागरीकांच्या आरोग्याचे दृष्टीने दि.12/04/2025 ते दि.30/04/2025 रोजीपर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुका / रॅली / शोभायात्रामध्ये प्लाझमा, बीम लाईट व लेझर बीम लाईटचा वापर करण्यास निर्बंध लागू करीत आहे.

**हा आदेश आज दिनांक 08/04/2025 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आला आहे.**

**( शोभा जाधव )**
**अपर जिल्हादंडाधिकारी धाराशिव**

**दिनांक:- 08/04/2025**
**ठिकाण:-धाराशिव**
**प्रतिलिपी:**

1) मा.विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) मा. पोलीस अधिक्षक, धाराशिव यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव
3) सहायक आयुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, धाराशिव केंद्र / गुन्हे अन्वेषण विभाग, धाराशिव
4) सर्व उपविभागीय दंडाधिकारी जि. धाराशिव यांना कार्यवाहीस्तव
5) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी जि.धाराशिव यांना कार्यवाहीस्तव
6) सर्व कार्यकारी दंडाधिकारी जि.धाराशिव यांना कार्यवाहीस्तव
7) जिल्हा माहिती अधिकारी,धाराशिव यांना कार्यवाहीस्तव

Signed by
Shobhadevi Vidyashgar Jadhav
Date: 08-04-2025 18:46:05

**अपर जिल्हादंडाधिकारी धाराशिव**